


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २४५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.१६ एप्रिल २०२५




# लाडक्या बहिणींना फक्त ५०० रुपयेच मिळणार?

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी स्पष्ट केली भूमिका !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** महायुती सरकारची लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतील पात्र ८ लाख महिलांना ५०० रुपयेच मिळणार असल्याची चर्चा सुरु आहे. महायुती सरकारच्या या निर्णयावरुन आता विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची ही घोर फसवणूक आल्याचा आरोप करत विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे.



राज्यातील ८ लाख महिलांना 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'अंतर्गत १००० रुपये मिळत असल्याने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेचा १५०० रुपयांचा मासिक हप्ता कमी करून फक्त ५०० रुपये मिळणार असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. यावरुन आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही स्पष्टीकरण दिले आहे. लाडकी बहीण योजनेचे नियम आधीचेच आहेत. जे इतर योजना लाभ घेतात त्यांना लाडकी बहीण योजना लाभ मिळणार नाही हे आधीच ठरलेलं. आम्ही फसवणार नाही, योजन चालूच ठेवणार आहे..' असं अजित पवार हे म्हणालेत.


''आमचं म्हणणं आहे कोणत्यातरी एकाच योजनेचा लाभ घ्यावा. जे केंद्राचे १००० मिळतात ते मिळणारच आहेत. त्याचा राज्य सरकारशी काही संबंध नाही. जर असं काही असेल तर ती ५०० रुपयांची योजना बंद करुन ती १५०० ची घ्यावी.. यापैकी कोणती योजना घ्यायची त्याचा निर्णय लाडक्या बहिणींवर आहे,'' असही ते म्हणालेत.

**शरद पवार गटाची टीका!**

मायभगिनींची घोर फसवणूक करणाऱ्या राज्य सरकारवर ४२० चा फसवणुकीचा गुन्हा का दाखल करू नये? राज्यातील ८ लाख महिलांना 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'अंतर्गत १००० रुपये मिळत असल्याने त्यांना मिळणारा 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेचा १५०० रुपयांचा मासिक हप्ता कमी करून फक्त ५०० रुपये देण्याचा राज्य सरकारचा निर्णय अन्यायकारक नाही का? निवडणुकीपूर्वी २१०० रु. चा हप्ता देऊ अशी वल्गना करणारे महायुती सरकार आज २१०० रुपये तर सोडाच, पण मासिक १५०० रुपयेही वेळेवर देत नाही. याउलट ते अजून कसे कमी होतील यासाठी नवनव्या क्लृप्त्या शोधत आहेत. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींची ही घोर फसवणूक आहे.. असे म्हणत शरद पवार यांच्या पक्षाकडून जोरदार टीका करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### धक्कादायक ! बापानेच स्वत:च्या १४ वर्षाच्या मुलीवर केला बलात्कार



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १५, शिळफाटा (ठाणे) :** शिळ-डायघर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असलेल्या कल्याण फाटा परिसरातील अभयनगर मध्ये असलेल्या अभयनगर चाळ, पोस्ट पडले, ता.जि.ठाणे या ठिकाणी बापलेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना घडली आहे. बापानेच आपल्या पोटच्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला आहे. मुलीच्या मनाविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले व त्यामुळे ती गर्भवती राहून तिची प्रसुती झाली म्हणून शिळ-डायघर पोलीस स्टेशन मध्ये बापावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलीच्या आईने फिर्याद नोंदवली आहे. आरोपी महेश रामसुंदर जयस्वाल (मुलीचा बाप) ३ ऑगस्ट २०२४ पासून तो ३ एप्रिल २०२५ पर्यंत अभयनगर मध्ये असलेल्या चाळ मध्ये राहत्या घराच्या किचनमध्ये मुलीच्या मनाविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध करीत होता. म्हणजेच ९ महिने तिच्यावर तो अत्याचार करत होता. मुलीच्या आईच्या तक्रारीनंतर शिळ -डायघर पोलीस स्टेशन, ठाणे मध्ये आरोपीवर गुन्हा रजि. न. कलम ३७०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ६५ (१), ६८ (अ), ६४(२) (एफ), बालकाचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १२ प्रमाणे कलम लावण्यात आले आहे. दाखल अधिकारी, तपासी अधिकारी सपोनि/प्रशांत खरात, ( शिळ डायघर पोलीस स्टेशन )यांच्याकडे सध्याही केस आहे. भेट देणारे अधिकारी वपोनि/संदिपान शिंदे, पोनि/गुन्हे जयंत राजूरकर, पोनि/प्रशांत खरात या सर्वांनी ५ एप्रिल २०२५रोजी रात्री १२:२०वा घटनास्थळी भेट दिली.

कल्याण फाटा, पडले, डायघर, शिळ फाटा, खार्डी, देसाई, खिडकाळी, फडके पाडा, शिळ ठाकूरपाडा, भोलेनाथ नगर, या सर्व परिसरातील नागरिक प्रशासन कडे मागणी करत आहेत. आरोपीवर कठोर ते कोठार शिक्षा करण्यात यावी. जेणेकरून पुन्हा या परिसरामध्ये अशी घटना घडणार नाही. हा खटला फास्टट्रॅक वर चालवण्यात यावा. अशी मागणी जोर धरू लागली आहे. समाजामध्ये अशा नराधम बापाला जगण्याचा अधिकार नाही. माणुसकीपणाला लाज वाटावी, मन स्तब्ध करणारी मानवतेला लज्जा वाटेल अशी घृणास्पद घटना आहे.

### बुलडाण्याची ग्रामदैवत आई जगदंबा मातेची चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** बुलडाण्याची ग्रामदैवत आई जगदंबा मातेची चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सव आज दि.१५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने सप्तनिक महाआरती पूजाताई संजय गायकवाड यांच्या हस्ते पार पडली. यावेळी केंद्रीय आयुषमंत्री भूमिपुत्र प्रतापरावजी जाधव, शिवसेना युवासेनेचे पदाधिकारी, महाराष्ट्र राज्य युवासेना कार्यकारणी सदस्य आणि युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, शिवसैनिक, माता-भगिनी, नागरिक आणि भाविक उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग महत्वाचा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषद राज्यातील नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (सीएमई) प्रणालीच्या माध्यमातून त्यांचा परवाना नूतनीकरणासाठी क्रेडीट पॉईंट दिले जातात. याच अनुषंगाने ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग महत्वाचा आहे. यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना ग्रामीण भागात स्वेच्छा सेवेसाठी क्रेडीट पॉईंट द्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला दिल्या आहेत.



ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरिकांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे योग्य ते उपचार प्राप्त होत नाही. त्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना ग्रामीण भागात स्वेच्छा सेवा देता यावी. जेणे करून ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना देखील चांगल्या प्रकारचे उपचार व आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल. मुख्यमंत्री यांच्या सूचनांचे पालन करत, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने राज्यातील नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांसाठी सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (सीएमई) प्रणालीत काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदे अंतर्गत सद्य:स्थितीत साधारण दोन लाख वैद्यकीय व्यावसायिक कार्यरत आहेत. या वैद्यकीय व्यावसायिकांचे वैद्यकीय परवान्यांचे दर पाच वर्षांनी नुतनीकरण करण्यात येते. हे नुतनीकरण करण्यासाठी या वैद्यकीय व्यावसायिकांना क्रेडीट पॉईंट दिले जातात. हे क्रेडीट पॉईंट देतांना वैद्यकीय व्यावसायिकांनी त्यांच्या क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत करण्यासाठी विविध परिषदांना उपस्थित राहणे आवश्यक असते. परंतू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैद्यकीय व्यावसायिकांसाठी असलेल्या सीएमई प्रणालीत सुधारणा करण्याच्या दिलेल्या निर्देशांनुसार, वैद्यकीय व्यावसायिकांना सीएमई प्रणाली अंतर्गत वैद्यकीय परवाना नुतनीकरणासाठी ग्रामीण भागात घेण्यात येणारे मोफत वैद्यकीय शिबीरे व इतर सेवाभावी उपक्रमांच्या माध्यातून स्वेच्छा सेवा देणे, आवश्यकता भासल्यास शस्त्रक्रिया करणे अशा प्रकारचे कोणत्याही मानधनाशिवाय आरोग्य सेवेत योगदान देता येणार आहे. तसेच तरुण डॉक्टर्स यांना देखील ग्रामीण भागातील आरोग्य समस्या जाणून घेणे शक्य होणार आहे. खऱ्या अर्थाने ग्राम ीण भागातील नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या डॉक्टरांपर्यंत पोहचण्यास मदत होणार असून शहरी भागातील डॉक्टरांना वैज्ञानिक दृष्ट्या ग्रामीण भागातील आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे शक्य होणार आहे. तसेच काही नोंदणीकृत डॉक्टर्स या स्वरूपाच्या सेवा देत आहेत. या प्रकारची सुधारणा सीएमई प्रणालीत करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत देण्यात आली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने केलेल्या सुधारणांनुसार, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक गावांमधील वैद्यकीय व सर्जिकल्स शिबिरांमध्ये जाऊन स्वेच्छा सेवा देतील. गावपातळीवरील वैद्यकीय शिबिरांमध्ये तीन तास काम केल्यास एक पॉईंट व सहा तास काम केल्यास दोन पॉईंट दिले जाणार आहेत. या पॉईंटसची मदत वैद्यकीय व्यावसायिकांना वैद्यकीय परवाना नुतनीकरण करतांना होणार आहे.

मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत तीन हजार ८०० व धर्मादायचे ५५० रुग्णालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये अशा साधारण चार हजार ५०० रुग्णालयांचा समावेश आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, धर्मादाय आयुक्त व राष्ट्रीय हेल्थ मिशन यांच्या समन्वयातून राज्यभर ग्रामीण भागांम ध्ये आतापर्यंत साधारण नऊ हजार ५०० आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून अजून ही अशा प्रकारच्या सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या सामुदायिक आरोग्य शिबिरांमध्ये साधारण ५० टक्के नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक सहभागी होत असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टर्स कडून उपचार मिळण्यास मदत होत असते. जेणे करून ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी हातभार लागणार आहे.

# राज ठाकरेंच्या भेटीला एकनाथ शिंदे, पडद्यामागे रणनीती काय?

**दि.१५, मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली. राज यांच्या शिवतिर्थ या निवासस्थानी ही भेट झाली. या वेळी त्यांच्या बरोबर खासदार श्रीकांत शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत उपस्थित होते. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जाते. शिवाय विधानसभा निवडणुकी वेळी निर्माण झालेली कटूता दुर करण्यासाठी ही शिंदे यांनी पुढाकार घेतल्याचं बोललं जात आहे. तर ही अनौपचारीक भेट असल्याचे मनसे नेत्यांनी स्पष्ट केले आहे.



विधानसभा निवडणुकीत काही जागांवर तडजोड व्हावी अशी मनसेची इच्छा होती. त्या दृष्टीने पडद्यामागे हालचालीही झाल्या. माहिम मतदार संघात तर अमित ठाकरे हे मैदानात असतानाही एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना उमेदवारी दिली. कल्याण ग्रामीणमध्ये ही विद्यमान आमदार असलेल्या राजू पाटील यांच्या विरोधात उमेदवारी दिला. असे अनेक ठिकाणी घडले. लोकसभेला राज यांनी शिंदेंना मदत केली होती. पण विधानसभेत तसे झाले नाही. त्यामुळे शिंदे आणि राज ठाकरे यांचे संबंध ताणले गेले होते. त्याच वेळी भाजपने मात्र राज यांच्याशी जवळीक वाढवली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील किंवा मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार असतील हे नियमित राज यांच्या संपर्कात होते. राज ही भाजपच्या जवळ जात असल्याचं चित्र होतं. अशा स्थिती मुंबई महापालिका निवडणुका कधी ही जाहीर होवू शकतात. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनीही राज यांना आपलसं करण्यासाठी आता पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी राज ठाकरेंची भेटी घेतल्याची चर्चा राजकीय वर्तूळात आहे.

मुंबईत उद्धव ठाकरे यांना मानणारा मोठा वर्ग आहे. अशा वेळी मुंबई महापालिकेत उद्धव यांना टक्कर द्यायची असेल तर शिंदे यांना राज यांच्या मदतीची गरज लागू शकते. राज यांनाही मुंबईत मोठा जनाधार आहे. त्याचा फायदा शिंदे यांना होवू शकतो असं राजकीय विश्लेषकांना वाटते. त्यामुळेच ही भेट असल्याचं ही बोललं जात आहे. शिवाय राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत एकत्र काम केले आहे. अशा वेळी भाजप पेक्षा राज यांनी आपल्याला साथ द्यावी अशी त्यांची रणनिती आहे.

मात्र मोठी राजकीय घडामोड होणार आहे असं म्हणणं घाईचं होईल अशी प्रतिक्रीया भाजप नेते प्रविण दरेकर यांनी दिली आहे.

राजकीय चर्चा या भेटीत होवू शकते. दोघे ही नेते एकाच विचारधारेचे आहे. त्यामुळे जुने नेते एकत्र येत असतील तर त्यात आश्चर्य वाटण्या सारखे काही नाही असंही दरेकर यावेळी म्हणाले. कदाचीत मुंबईच्या काही प्रश्नावर चर्चा ही या दोघांमध्ये होवू शकते असंही ते म्हणाले. दरम्यान ही राजकीय भेट नसावी. युती किंवा आघाडीचा यात कुठलाही विषय नाही. या भेटीबाबत आताच निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल असं मनसे नेते अविनाश अभ्यंकर यांनी सांगितलं.

# संपादकीय



## महापद्मनंद



महापद्मनंद यांचा जन्म मगध (बिहार) राज्यातील मलय गावात झाला होता. त्यांचे वडील नंदीवर्धन हे शिशुनाग वंशाचे शेवटचे राजे होते. तत्कालीन भारतामध्ये पितृसत्ताक पद्धत होती. ब्राम्हण, जैन, बौद्ध ग्रंथ व युनानी लेखकांच्या मतानुसार महापद्मनंद हे शूद्र वर्णातील नाभिक जातीचे होते.म हापद्मनंदला भारताचा पहिला शूद्र सम्राट होण्याचा मान मिळाला आहे. महापद्मनंद हे गौरवशाली नंद घराण्याचे संस्थापक होते.

महापद्मनंदने काशी, कौसल, मल्ल, चेदी, वत्स, मत्स्य, अंग, मगध,मिथिला, अवंती, कुरु, पांचाल, गांधार, कंबोज, शुरसेन, अश्मक अर्थात कलिंग ही सोळा महाजन पदे जिंकून घेतली. सर्व क्षत्रियांचा पराभव करून सार्वभौम सम्राट बनून एकछत्री प्रशासन व्यवस्था राबविली.म्हणूनच त्यांना 'केंद्रिय शासन पद्धतीचे जनक' असे म्हटले जाते. विविध साहित्यामध्ये त्यांचेबद्दल सर्व क्षत्रांतक,दुसरा परशुराम, भार्गव, एकराट, एकछत्र राजा, अनुल्लंघन शासन असा उल्लेख आढळतो.

महापद्मनंदने स्वत:कडे असणारी चतुरंग सेना राजधानीत न ठेवता साम्राज्याच्या सीमेवर ठेवली होती.याच कालखंडात सिकंदर स्वारीसाठी आला होता परंतु युनानी सैन्याने नंदाची विराट सेना पाहून आक्रमण करण्याचे धाडस सुद्धा दाखविले नाही.

महापद्मनंदने आपल्या विशाल साम्राज्याची राजधानी पाटलीपुत्रला(पटणा) शिक्षणाचे केंद्र बनविले. व्याकरणाचे आचार्य पाणिनी हे महापद्मनंदचे मित्र होते. त्यांनी महापद्मनंदच्या सहकार्याने संस्कृत व्याकरणाचे प्रमाण मानला जाणाऱ्या जगप्रसिध्द 'अष्ठद्याय' ग्रंथाची निर्मिती केली. महापद्मनंदच्या दरबारात वर्ष, उपवर्ष, आचार्य पिंगल, कत्यायन, वर रुची, ब्याडी इ.महान विद्वानांना राजाश्रय मिळाला होता.

जगाच्या इतिहासात प्रथमच महापद्मनंदनी व्यापार वृद्धीसाठी 'कर्षपन' हे चांदीचे नाणे काढले. संपूर्ण साम्राज्यात एकाच वजनमापणांची प्रमाणित पद्धत तयार केली त्यांना 'नंदक्रमनिती' म्हणून ओळखले जाते.

महापद्मनंदची पंडूक, पांडूगती, भुतपाल, राष्ट्रपाल, गोविषणाक, दश सिद्धक, कैवर्त, धनानंद ही मुले नवनंद म्हणून ओळखली जातात.इतिहासप्रसिद्ध धनानंद हा नंद घराण्याचा शेवटचा सम्राट होता.

नंद वंशाच्या महानतेची प्रचिती पतंजली रचित महानंद महाकाव्य व सम्राट चंद्रगुप्त रचित कृष्णचरित महाकाव्याच्या सुरुवातीच्या ३ श्लोकांमध्ये दिसून येते. परंतू इथल्या जातीवादी व्यवस्थेने हे ग्रंथ समूळ नष्ट केले. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळ अर्थात् बालभारतीला सुध्दा इयत्ता ६ वी च्या इतिहास पुस्तकातील मगधचे नंद घराणे या प्रकारनात सम्राट महापद्मनंद यांच्या नावाचा विसर पडला आहे. तरी आजही या देशातील लेणीच्या अबोल भिंती महापद्मनंदच्या इतिहासाची महती गात आहेत.

# 'ग्रेट पर्सन' कोणाला म्हणावे?



आजकाल लोक एकमेकांचे वाढदिवस दणक्यात साजरा करतात. वाढदिवस वेगवेगळ्या पध्दतीने साजरा करताना काही लोक वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करतात.कोणी कीर्तन, प्रवचन व भजनाचा कार्यक्रम आयोजित करतात तर कोणी व्याख्यान ठेवतात.अशा कार्यक्रमांमध्ये निवेदक व प्रमुख पाहुणे ही मंडळी ज्यांचा वाढदिवस आहे त्यांचे फार कोडकौतुक करतात.त्यांना ग्रेट पर्सनची उपाधी देऊन मोकळे होतात.परंतु,ग्रेट पर्सनची उपाधी सहजपणे कोणालाही देता येत नाही हे त्यांना कोण समजावून सांगणार बरे?अगदी सहजपणे उचलली जीभ अन् लावली टाळ्याला आणि एखाद्याला ग्रेट पर्सन म्हणा हे कसे शक्य आहे?ग्रेट पर्सन तोच व्यक्ती असतो जो खरोखर लाजवाब असतो,वागायला बोलायला एकदम आदर्श व्यक्ती असतो.आपल्या कमाईचा एक हिस्सा समाजासाठी, गरजू व गोरगरीब जनतेसाठी खर्च करतो. ग्रेट पर्सन हे नेहमीच इतरांच्या मदतीला धावून जातात, आपला अमूल्य वेळ हा समाज कार्यासाठी देतात.

छत्रपती शिवाजी महाराज,संत तुकाराम महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,राजर्षी शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे,संत गाडगेबाबा ,संत तुकडोजी म हाराज या महापुरुषांनी सर्वसामान्य जनतेच्या उद्धारासाठी,बहुजनांच्या कल्याणासाठी आणि स्त्रियांच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य खर्ची केले आहे.त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत फक्त लोकांचा विचार केला,लोकांच्या भल्यासाठी लढा दिला म्हणून आपले हे सर्व महामानव खरोखरच ग्रेट पर्सन म्हणून शोभतात.त्यांची बरोबरी इतर कोणीही करू शकत नाही. तरीही काही पक्षांचे कार्यकर्ते हे आपल्या राजकीय नेत्याला महामानवाच्या उपाध्या देण्यास मागेपुढे पाहत नाहीत.हे कितपत योग्य आहे? महामानव हे खरोखर युगप्रवर्तक व समस्त मानव जातीसाठी दीपस्तंभ होते.आजचे राजकारणी तेवढे महान होऊ शकत नाहीत हे लक्षात ठेवा.

राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, त्याग मुर्ती रमाई ह्या क्रांतीकारी युगप्रवर्तक व महान

अशा महिला होत्या ज्यांनी आपल्या कार्यामुळे सामान्य जनतेच्या मनामनांत त्यांनी कायमस्वरूपी आदराचे स्थान मिळविले आहे.या खरोखर ग्रेट वुम ेन्स होत्या.भारताचे मिसाईल मॅन तथा माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे.अब्दूल कलाम,बाबा आमटे, सिंधुताई सपकाळ,साने गुरुजी, मेजर ध्यानचंद,डॉ.विठ्ठल लहाने यांनी आपले आयुष्य देशासाठी व देश बांधवांसाठी अर्पण केले आहे. म्हणून ते ग्रेट पर्सन व ग्रेट वुमेन्स ठरतात.जे लोक चारित्र्याने व कर्माने खरोखरच श्रेष्ठ असतात ते ग्रेट पर्सन असतात. त्यांच्या कार्याचा कीर्ती सुगंध आपोआप दरवळत असतो.आर्थिक परिस्थिती नाजूक असणाऱ्या रुग्णांवर व गरीब रुग्णांवर मोफत उपचार करणारे डॉक्टर ग्रेट पर्सन असतात.भुकीने व्याकूळ झालेल्या गोरगरीबांना फुकट जेवण वाढणारे हॉटेल मालक हे खरोखरच ग्रेट पर्सन असतात.रोडवर अपघात झाल्यावर अपघात ग्रस्तांना आपल्या गाडीने तात्काळ दवाखान्यात घेऊन जाणारे व्यक्ती ग्रेट पर्सन असतात. आर्थिक परिस्थिती नाजूक असणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरणारे शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी ग्रेट पर्सन असतात.पैशासाठी न खेळता केवळ देशासाठी प्रामाणिकपणे खेळ खेळणारे खेळाडू ग्रेट पर्सन असतात.

माझे वडील दामोदर गुळवे व आई कौशल्याबाई गुळवे यांनी आम्हा भावंडांच्या शिक्षणासाठी नेहमी जीवाचे रान केले,त्यांनी कष्टाची कामे केली म्हणून ते आमच्यासाठी ग्रेट पर्सन व ग्रेट वुमेन आहेत.माझी आजी पारुबाई ही अगदी मोफत दाईचे काम करायची.तिच्याकडे औषधी वनस्पतींचा बटवा होता.ती गावातील आजारी लोकांवर अगदी मोफत उपचार करायची. ती साऱ्या गावासाठी ग्रेट वुमेन होती.शालेय जीवनात मला शिक्षणाचे धडे देणारे माझे शिक्षक गंगाधरराव मोरे, भाऊराव डोंगरे,अनंतराव बोरोळे, अप्पाराव लोहारे,बंकटराव गरड, गणेशराव गुळवे गुरुजी,आर.एल. सोमवंशी सर,श्यामराव शेकडे सर हे माझ्यासाठी नेहमीच ग्रेट पर्सन असणार आहेत. आमच्या गावात शिक्षणाची गंगा सुरू व्हावी म्हणून, गोरगरीबांना शिक्षण मिळावे म्हणून आपली दोन एकर शेती शाळेला दान करणारे निवृत्तीराव पाटील खरोखर ग्रेट पर्सन होते.आम्हाला अवांतर वाचनाची सवय लावणारे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आम्हाला बाबासाहेबांचा दैदिप्यमान इतिहास सांगणारे,मराठवाडा मुक्तिसंग्राम त भाग घेतलेले स्वातंत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे हे ग्रेट पर्सन होते.

ज्या व्यक्तींचे कार्य इतरांच्या भल्यासाठी असते,जे लोक समाजहितासाठी नेहमी कार्यतत्पर असतात आणि जे लोक आदर्शवत जीवन जगतात तेच लोक ग्रेट पर्सन म्हणून शोभतात.चला तर मग आपणही ग्रेट पर्सन बनण्याचा प्रयत्न करू या.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८**

# महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी, महासंघाचे संस्थापक अध्यक्ष ग.दि. कुलथे अनंतात विलीन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, नेरूळ (नवी मुंबई) :** राज्यातील सर्व शासकीय राजपत्रित अधिकाऱ्यांची अधिकृत शिखर संघटना महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, मुख्य मार्गदर्शक, सल्लागार गणपत दिनकर कुलथे, यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने तसेच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांच्या नेरुळ येथील राहत्या घरी काल दि.१४ एप्रिल रोजी रात्री ९.०० वाजता निधन झाले. आज त्यांच्या कुटुंबियांच्या तसेच शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या संघटना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नेरूळ येथील शांतीधाम येथे कुलथे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



यावेळी कुलथे कुटुंबियांसमवेत विविध शासकीय विभागातील अधिकारी- कर्मचारी, विविध संलग्न संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विश्वास काटकर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, राजपत्रित अधिकारी महासंघाचे माजी अध्यक्ष रवींद्र धोंगडे, विद्यमान अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, दुर्गा मंचच्या अध्यक्षा डॉ. सोनाली कदम, माजी माहिती संचालक देवेंद्र भुजबळ आदींनी यावेळी स्वर्गीय कुलथे यांच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी उपस्थित सर्वांनी स्वर्गीय ग.दि. कुलथे यांचे संघटना चळवळीतील राहिलेले अपूर्ण कार्य त्याच तडफेने, प्रामाणिकपणाने पूर्ण करण्याचा संकल्प करून स्व. कुलथे यांना श्रद्धांजली वाहिली.

# ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**


**दि.१५, ऐरोली (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई म हानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत अनिल पोपट पाटील यांचे एफ- २१६, सेक्टर ०३, ऐरोली येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे.

# विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन

जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांची आज जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली.

या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रम ात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्म विश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात म ला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो. त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे



रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळ्खयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा. चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे म ांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट ' द कीड ' याचं ओपनिंग टायटल होतं अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर. स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत.

आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता प्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## न्यू ब्लॉसम फुल व समर्थ प्राथमिक विद्यालयात डॉ.बाबासाहेबांची जयंती साजरी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१४, विंचूर (नाशिक) :** न्यू ब्लॉसम इंग्लिश मीडियम स्कूल आणि समर्थ प्राथमिक विद्यालय विंचूर येथे शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने झाली, जे शाळेचे प्राचार्या ज्योती माठा आणि पुजा निकम, समन्वय माधवी सहाय यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली कामडे मॅडम यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या सुत्रसंचालनामुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक प्रवाही आणि सुसंगत दिशा मिळाली.या विशेष प्रसंगी, जयश्री नेवगे मॅडम आणि खापरे मॅडम यांनी प्रभावी भाषणे दिली. त्यांनी डॉ. आंबेडकर यांचे शिक्षण, संविधान निर्मितीमधील योगदान, आणि सामाजिक समतेसाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांच्या भाषणांनी उपस्थित सर्वांना प्रेरित केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देखील बाबासाहेबांवरील भाषणे आणि गीते सादर केली. या प्रसंगी ग्रंथालयातील पुस्तक वाटप करून मुलांना वाचन करण्यास प्रवृत्त करण्यात आले.मुलांनी पुस्तक वाचन अगदी मन लाऊन केले. यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ.शिवाजी महाराज, महात्मा गांधी, विज्ञान, बोधकथा यांचा समावेश होता.त्यानंतर मुलांच्या पुस्तकावरील प्रतिक्रिया घेण्यात आल्या.संपूर्ण मुलांनी प्रतिक्रिया ऐकल्या यामुळे मुलांच्या वैचारिक विकास होण्यास प्रेरणा मिळाली. संपूर्ण वातावरण भारावून गेले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन बाबासाहेबांना अभिवादन केले आणि त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचा संकल्प केला.

## बहूजन योध्दा सामाजिक संघटनेच्या वतीने डॉ.आंबेडकर यांना अभिवादन



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१४, धाराशिव :** भारतरत्न, संविधाननिर्माता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध जाती धर्मातील पदाधिकारी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या निमित्ताने संस्थापक अध्यक्ष धनंजय नाना शिंगाडे, मुकुंद घुले, विशाल शिंगाडे, पप्पू ऊर्फ संजय मुंडे, खलील सय्यद, रवि कोरे आळणीकर, लक्ष्मण माने, नाना घाडगे, पांडू भोसले, कृष्णा भोसले, आबा सुर्यवंशी, सुरेश गवळी, अनिरुध्द कावळे यांच्या समवेत विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होत बाबासाहेबांचे कार्य आणि विचार जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला.

शोषित, वंचित, दलित, गरीब, श्रमिक वर्गाला न्याय मिळवून देणाऱ्या आणि एक नवभारत घडविण्याचं स्वप्न पाहणाऱ्या या महामानवाच्या विचारांची आज अधिक गरज असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## बिलोली आगारात आंबेडकर जयंती निमित्त रक्तदान शिबीर



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१४, बिलोली :** राज्य परिवहन महामंडळाच्या बिलोली आगारात १४ एप्रिल रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यानंतर जयंती मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात एकूण ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी आगार व्यवस्थापक नरसिंग निम्मनवाड, वाहतूक निरीक्षक सोनटक्के, भा मा शितळे, जयंती मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ जाधव, राजेश कदम, अविनाश जाधव, कैलास पांचाळ, साहेबराव नरहरे, चिलकेवार, विजयकुमार कोलंबरे, आर बी ढवळे, एच बी पाटील, संजय भंडारे आदी कर्मचारी उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वीतेसाठी आगारातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. नांदेड येथील जिजाऊ ब्लड सेंटरचे अधिकारी व कर्मचारी यावेळी रक्त संकलन करण्यासाठी उपस्थित होते.

## माणवासियांच्या सेवेत उरण-वारुगड लालपरी सेवा आज पासून सुरू




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, वारुगड :** आज दिनांक १५ एप्रिल रोजी उरण ते वारुगड एसटी बस सुरू करण्यात आली असून वारुगड ग्रामस्थ व मुंबईकर यांच्या पुढाकाराने एसटी बस चालू करण्यात आली. समस्त वारुगड ग्रामस्थांनी वारंवार उरण एसटी डेपोला पत्रव्यवहार केला असता उरण डेपोचे आगार व्यवस्थापक दत्तात्रय कुलकर्णी यांनी स्वतः पुढाकार घेऊन वारुगड ग्रामस्थांच्या सेवेत लाल परी दाखल केली. ही बस उरण वरून सकाळी ५:३० निघेल ही बस वाशी कळंबोली मेघा हायवे मार्गे स्वारगेट जेजुरी फलटण मार्गे वारूगड अशी असेल ही बस चालू झाली असता सर्व ग्रामस्थ व मुंबईकर यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महाबळेश्वर येथे महापर्यटन महोत्सव २ ते ४ मे रोजी भव्य आयोजन...

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१४, महाबळेश्वर :** महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि भारतीय पर्यटन उद्योगातील वाढत्या महत्त्वाला प्रतिबिंबित करण्यासाठी महाबळेश्वर येथे महापर्यटन महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील जागतिक दर्जाचे लोकप्रिय थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या महाबळेश्वरमध्ये २ ते ४ मे २०२५ या कालावधीत 'महाबळेश्वर महापर्यटन महोत्सव २०२५' साजरा होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागातंर्गत आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने हा पर्यटन महोत्सव भव्य दिव्य स्वरूपात साजरा होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांच्या उपस्थितीत होणार आहे.

दि .१२ एप्रिल रोजी येथील खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मधुबन सभागृहात प्रांताधिकारी राजेंद्र कचरे




यांच्या मार्गदर्शनाखाली सदर महोत्सवा संदर्भात सविस्तर माहिती व महोत्सवात सादर होणाऱ्या कार्यक्रमांचे सादरीकरण दाखविण्याकरिता सभेचं आयोजन करण्यात आले होते.यावेळी महाबळेश्वरच्या तहसीलदार तेजस्वीनी पाटील, महाबळेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी, योगेश पाटील,सा.बां. उप अभियंता,अजय देशपांडे, पर्यटन विभागाचे हनुमंत हेडे तसेच शहरातील व्यापारी, विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थिती होते.

प्रांताधिकारी राजेंद्र कचरे म्हणाले स्थानिक नागरिकांसाठी पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्या सुचने नुसार या महोत्सवात पर्यटकांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाबळेश्वरमधील प्रसिद्ध वेण्णा तलावात नेत्रदीपक लेझर शो होणार आहे. येथे देशभरातील पर्यटन उद्योगातील तज्ज्ञ एकत्र येतील.

> शासनाच्या पर्यटन महोत्सवांच्या माध्यमातून पर्यटन उद्योगाला चालना दिली जाणार असून पर्यटकांना मोफत वाहनपार्किंग सुविधा, मोफत टोल करण्यात येणार आहे , विविध प्रकारच्या खाद्यांचा आनंद घेता येणार आहे महाबळेश्वर येथील महोत्सवामुळे येथे पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. याचा परिणाम राज्यातील आणि देशातील पर्यटनाला सकारात्मक ठरेल.

महाबळेश्वरमध्ये गुजरातमधील कच्छ रणच्या धर्तीवर पर्यटकांसाठी शंभराहून अधिक टेन्ट्स उभारण्यात येणार आहेत. पर्यटकांच्या आकर्षणाकरीता ही अत्याधुनिक निवासव्यवस्थेकरिता टेंट सिंटी उभारली जाणार आहे. वेण्णा तलावात पर्यटकांना तरंगत्या मार्केटमधील खरेदीचा आनंद घेता येणार आहे. तसेच तापोळा येथे साहसी खेळ आणि वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेता येईल. तर पाचगणी येथील हॅरिसन फॉली येथे पॅरा ग्लाइडींग तर वेलो सिटी येथे हेलीकॉप्टर राईडचा आनंद घेता येणार आहे. राज्यातील प्रत्येक भागातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद पर्यटकांना येथे घेता येणार आहे. तसेच, पारंपरिक मनोरंजनासाठी लोककलांचे सादरीकरण होणार आहे.

सदर महोत्सवाच्या माध्यमातून भारताच्या जागतिक टुरिझममधील वाढत्या भूमिकेला अधोरेखित करण्यात करण्यात येणार आहे.

या बैठकीत महाबळेश्वरचे मा.नगराध्यक्ष,डि.एम.बावळेकर, शिवसेनेचे मा.जिल्हाप्रमुख, राजेश कुंभारदरे, जिल्हा बँक सदस्य, राजेंद्र राजपुरे, मा.सभापती, संजय गायकवाड, किसनशेठ शिंदे, मा.नगराध्यक्ष, युसुफ शेख, रवींद्र कुंभारदरे, शिवसेना शहरप्रमुख, विजय नायडू, गोपाळ लालबेग, ऋषिकेश वायदंडे, किरण शिंदे, यांनी सुचना मांडल्या.

# ताडोबाच्या मोहर्ली वनपरिक्षेत्रात वाघाचा मृत्यू ! मृत वाघ टी-२४ असण्याची शक्यता

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील मोहर्ली वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र सीतारामपेठ अंतर्गत येणाऱ्या भामडेळी गावालगत, इकाई धरण परिसरात सोमवार १४ एप्रील रोजी वनकर्मचारी गस्त घालत असताना एक वयस्कर वाघ मृतावस्थेत आढळून आला.

वनकर्मचाऱ्यांनी या घटनेची माहिती वरिष्ठांना दिली. माहिती कळताच संवस ( जंकास-२) संकेत वाठोळे, मोहर्लीचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे सदस्य धनंजय बापट, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे प्रतिनिधी बंडू धोतरे, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे प्रतिनिधी मुकेश भांदककर, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंदन पोडचेलवार, पशुसंवर्धन विभागाचे सेवा निवृत्त सहाय्यक आयुक्त डॉ. पुरुषोत्तम कडूकर, मोहर्लीचे पशु वैद्यकीय पर्यवेक्षक मिलिंद जक्कुलवार, तसेच वनपाल व क्षेत्रीय वनरक्षक यांनी उपस्थित होऊन पाहणी केली. या वाघाची ओळख पटली नसून त्याचा मृत्यू १५ ते २० दिवसापूर्वी झाल्याचा अंदाज वनविभागाने वर्तवला आहे.



३१ मार्च २०२५ रोजी शेतकऱ्यांनी शेतातील पिंजरे जाळण्यासाठी लावलेल्या आगीमध्ये इकाई धरण परिसरातील गवताळ भागसुद्धा जळला आहे. मृत वाघाचे नखे, दात, हाडे शाबूत असून आदींमुळे ते अर्धवट जळाल्याच्या स्थितीत दिसून आले आहे. ही आग वाघाच्या मृत्युनंतर लावण्यात आली आहे. कारण मृतदेहाच्या बाजूला मांस सडल्यानंतर लागलेल्या अळ्यासुद्धा जाळल्याचा दिसून आले. मृत वाघाचे पशु वैद्यकीय अधिकारी यांनी विच्छेदन करुन नमुने गोळा केले आहे. उत्तरीय तपासणीमध्ये मृत वाघाच्या मृत्युचे कारण स्पष्ट होणार आहे. मृत वाघाचे डीएनए ओळखीसाठी सीसीएमबी हैद्राबाद येथे पाठविण्यात येणार आहे.

या परिसरात १६ मार्च २०२५ पर्यंत नियमितपणे टी-२४ वाघीण व तिचे तीन बछडे दिसुन येत होते. फेब्रुवारी २०२५ पासून बछडे २ वर्षाचे झाल्याने ते या वाघीणीपासून स्वतंत्र झाले होते. १६ मार्च २०२५ पासून ही वाघीण दिसून न आल्याने शोध घेणे सुरु होते. त्यामुळे मृत वाघ हा टी-२४ असण्याची शक्यता वनविभागाने वर्तविले आहे. या प्रकरणी वन गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक कुशाग्र पाठक, व संवस ( जंकास-२) संकेत वाठोरे, यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे करीत आहे.

# नवीन पूल बाबूपेठवासियांसाठी चंद्रपूरशी मने जोडणारा दुवा ठरेल : आ.मुनगंटीवार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, चंद्रपूर :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी बाबूपेठ येथील नवीन उड्डाण पुलाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल असे नामकरण करण्यात आले. या नामफलकाचे अनावरण करताना मनापासून आनंद झाला. हा नवीन उड्डाणपूल बाबूपेठवासियांसाठी चंद्रपूरशी मने जोडणारा ठरणार आहे, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बाबूपेठ येथील उड्डाण पुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले. या उड्डाण पुलाच्या नामफलकाचे अनावरण आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. आ. मुनगंटीवार म्हणाले, 'हा उड्डाण पुल व्हावा, अशी बाबूपेठ येथील नागरिकांची अनेक वर्षांपासून इच्छा होती. या पुलासाठी मी ६५ कोटी रुपये मंजूर करू शकलो, यासाठी मी भाग्यवान आहे. हा पूल



बाबूपेठवासीयांची चंद्रपूरशी मने जोडणारा दुवा ठरेल, असा मला विश्वास आहे.' भाजपा महानगरचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व येथे उपस्थितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करण्याचे आवाहनही आ. मुनगंटीवार यांनी केले. आ. मुनगंटीवार म्हणाले, 'लंडनमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देता आला, ही माझ्या आयुष्यातील एक सौभाग्यशाली घटना आहे. १९२०-२१ मध्ये डॉ. बाबासाहेब लंडनमधील ज्या निवासस्थानी मुक्कामाला होते, तेथे जाऊन जनसेवेची ऊर्जा घेऊन येता आले, यासाठी स्वतःला नशीबवान समजतो.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या दोन जिल्ह्यांमध्ये दीक्षा दिली, त्यात चंद्रपूरचा समावेश आहे, ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. मला स्वतःला मंत्री म्हणून डॉ.बाबासाहेबांच्या कार्याला, त्यांच्या विचारांना अभिवादन करण्याची संधी मिळाली. १२५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अनके वास्तू निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देता आला. दीक्षाभूमीसाठी २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देता आला. आज मला त्यांच्या नावाने उड्डाणपुलाच्या नामफलकाचे उद्घाटन करता आले. या सर्व घटना माझ्यासाठी ऊर्जा देणाऱ्या आहेत, अश्या भावनाही आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

**महामानवाला सेवेतून अभिवादन !**

चंद्रपूर रेल्वे स्टेशनजवळील उडिया मोहल्ला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नवबौद्ध पंचशील मंडळ व साहेब मित्रमंडळाच्या कार्याचे अभिनंदन केले. बल्लारपूर येथे अभिवादन कार्यक्रमाला आ. मुनगंटीवार उपस्थित होते. तसेच पडोली येथे पाणपोई व महाप्रसाद वाटप करण्यात आले.

सेवेचं रूप, समतेचं पूजन करत दुर्गापूर, नवरत्न बुद्ध विहार येथे आ. मुनगंटीवार यांनी पुष्पांजली अर्पण केली. चंद्रपूर आंबेडकर चौक येथेही आ. मुनगंटीवार यांनी डॉ.बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केले. यावेळी पाणी व बिस्कीट वाटप उपक्रमात आ. मुनगंटीवार यांनी सहभाग घेतला.

# घरगुती गॅस दरवाढी विरुद्ध दिव्यात शिवसेनेचा दणका !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १५, दिवा (ठाणे) :** गेल्या आठवड्यात घरगुती सिलेंडरची किंमत ५० रुपयांनी वाढल्याने गृहिणींचे आर्थिक गणित कोलमडले आहे. यातच आजपासून घरगुती पीएनजी आणि वाहनांच्या सीएनजी गॅसची दरवाढ झाल्याने भाजप सरकार विरोधात आज संतापाचा उद्रेक झाला. दिव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आंदोलनाचा दणका दिला.

मुंबईसह उपनगरात आज पासून सीएनजी दीड रुपयाने तर पीएनजी म्हणजे घरगुती पाईप गॅस एक रुपयाने महागला आहे त्यामुळे आता सीएनजी ७९.५० रुपये प्रति किलो तर पाईप गॅस प्रति युनिट ४९ रुपये झाला आहे. घरगुती गॅस साठीचा खर्च वाढला असून डॉलरच्या तुलनेत रुपयाचा भाव वधारल्यामुळे गॅसच्या किमती वाढवावे लागल्याचे एमजीएलच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हेच का मोदीचे अच्छे दिन असा सवाल विचारत दिव्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून महिलांनी चुलीवर ती जेवण बनवून भाजप सरकारचा निषेध केला.

सिलेंडरच्या सबसिडीच्या नावाखाली हे सरकार लोकांची फसवणूक करत आहेत. देशात उज्वला योजना राबवून मोदींनी मन की बात मध्ये म्हटले होते की महिलांचे धुराचे अश्रू मला पहावत नाहीत म्हणून उज्वला योजना राबवण्यात आली. परंतु आज याच सिलेंडरचे भाव गगनाला भिडलेले असून सामान्य महिलांचे हाल होत आहेत. व पुन्हा चुलीवरती जेवण बनवण्याची परिस्थिती देशात मोदी सरकार करत आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिवा शहराच्या वतीने गॅस दरवाढी विरुद्ध निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचा नेतृत्व दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे, दिवा महिला शहर संघटिका ज्योती पाटील, विभाग संघटिका मयुरी पोरजी यांनी केले.

यावेळी उपशहर प्रमुख तेजस पोरजी, उपशहर संघटक प्रवीण उतेकर, विभाग प्रमुख नागेश पवार, संजय जाधव, रवी रसाळ, शनिदास पाटील, उपविभाग प्रमुख अजित माने, राजेश गुप्ता, राजेश गुप्ता, शाखाप्रमुख राजेश गुप्ता, नितीन काळे, विजय कदम, विभाग संघटिका सुवासिनी गुडेकर, उप संघटिका अशा इंगोले, शाखा संघटिका संगीता मचाडो, स्वाती चव्हाण आधी कार्यकर्ते उपस्थित होते.

